जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा, यांचे कार्यालय
**OFFICE OF THE COLLECTOR, MUMBAI SUBURBAN DISTRICT**
जि ल्हा नि यो ज न स मि ती
**DISTRICT PLANNING COMMITTEE**
प्रशासकीय इमारत ९ वा माळा वांद्रे (पूर्व) मुंबई. ४०० ०५१
**ADMINISTRATIVE BUILDING, 9 TH FLOOR BANDRA (EAST) MUMBAI 400 051**
**TEL .NOs. 2 655 00 66. 2651 47 42, 2 655 67 99 FAX. 2655 68 05**


क्र.:जिनिस १०३०/का०३/आस्थाविका/प्र.क्र.-७९/८४६ दिनांक :३०/०३/२०१६

# आ म दा र स्था नि क वि का स का र्य क्र म स न २०१५-१६
# प्र शा स की य मं जू री आ दे श

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
वांद्रे ई - ५१
आवक 6002
दिनांक - 5/4/2016

**वाचा :** १.शासन निर्णय क्र.स्थाविका २०११/प्र.क्र.४७/का.१४८२ दि. १३.०९.२०११
२.क्र.स्थाविका०४१५/प्र.क्र.७२/का.१४८२, दि. २३.०४.२०१५
**३.मा.आ.श्री.विजय (भाई) गिरकर, दि. १६.०७.२०१५ व दि.२४.०२.२०१६**
४.मुख्याधिकारी, मुं.झो.सु.मं. यांचे पत्र क्र.१९६/१६, दिनांक.२२.०३.२०१६ व २९.०३.२०१

ज्या अर्थी स्थानिक निकडीची कामे करण्याकरीता निधी उपलब्ध करुन त्याचे विनियोजन करण्याचे अधिकार जिल्हा नियोजन समिती मुंबई उपनगर जिल्हा यांना देण्यात आले आहेत.त्याअर्थी जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा यांना अशा प्रकारच्या कामाकरीता प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. आता मी **शैला ए.,जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा** या आदेशाच्या जोडपत्रात नमूद केलेल्या कामांना खालील अटींवर मंजूरी देत आहे.

**अटी व शर्ती :-**

१. हया कार्यक्रमावरील खर्च पुढील लेखा शिर्षातुन सन २०१५-१६ या वर्षी केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा "नियोजन विभाग, मागणी क्रमांक ओ-१०. ४५१५,इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च,१०२-सामुहिक विकास.पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (१)बहुउद्देशिय कार्यक्रम. (००) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम (संकेताक ४५१५००१२) (योजनांतर्गत ) (दत्तमत )५३ मोठी बांधकामे"

२. जोडपत्रातील स्तंभ क्रं.८ मध्ये दर्शविलेल्या रक्कमे इतकाच खर्च करण्यात यावा.

३. या कार्यक्रमांवर होणा-या खर्चाचा स्वतंत्रपणे हिशोब ठेवण्यात यावा.या कार्यक्रमाखाली स्थानिक स्वायत्त संस्था,मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ व सार्वजनिक बांधकाम विभाग, यांना देय असलेल्या अनुदानाच्या खर्चासंबंधी शासन निर्णय क्र.डीपीसी-१०८४/सीआर-२१,पीआर-२,दि.२६ ऑक्टोबर,१९८४ व १७नोव्हेंबर,१९८४ आणि क्र.एसपीडी-१०८९/१५३/सीआर-१५/योजना ६,दि. ३१.०८.१९८९ च्या शासन निर्णयानुसार आदेश पाळण्यात यावेत.

४. प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत योजना राबविणा-या अभिकरणांनी मासिक कामानिहाय प्रगती अहवाल व पूर्ण झालेल्या कामांची उपयोगिता प्रमाणपत्रे सुध्दा सादर करावीत.

५. प्रशासकीय मंजूरीनंतर कार्यान्वयीन अभिकरणांना त्यांच्या संबंधीत विभागातील सक्षम अधिका-याकडून कामांस तांत्रिक मंजूरी घेणे बंधनकारक आहे.

६. जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली याचा अर्थ जागेचे नाहरकत प्रमाणपत्र दिले असे समजण्यात येऊ नये,नाहरकत प्रमाणपत्र संबंधीतांकडून प्राप्त करुनच कामे कार्यान्वित करणे ही संबधित कार्यान्वयीन अभिकरणची सर्वश्री जबाबदारी आहे.जागेचे ना हरकत प्रमाणपत्र संबंधीत जागा मालकाकडून प्राप्त केल्याशिवाय कामे कार्यान्वित करण्यात येऊ नयेत.तसेच इमारती बांधकामे,रस्ते,शौचालय,पोलीस चौकी बांधण्यापूर्वी आवश्यक त्या ठिकाणी शासन निर्णय स्थाविका-२००३-प्र.क.३६९/का-१४४५,दि. २८ नोव्हेंबर २००३ अन्वये सूचनानूसारच फलक लावण्यात यावा.जेणेकरुन स्थानिक लोकांकडून कोणताही न्यायालयीन गूंता निर्माण होणार नाही याची जबाबदारी कार्यान्वयीन अधिका-यांनी घ्यावी.

७. कामे पुर्ण झाल्यावर कामांच्या दर्शनी भागावर खालीलप्रमाणे फलक लावण्यात यावा.कामे बांधकाम स्वरुपाची नसतील तेव्हा लाकडी फलक शक्य असल्यास लावावा.

3039 6/8/16

| आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेतलेले काम- |
|---|
| संबधित आमदारांचे नाव व कांमाचे नांव- |
| कामाचे वर्ष — |
| काम सुरु झाल्याचा दिनांक- |
| काम पुर्ण झाल्याचा दिनांक- |
| कामावर करण्यात आलेला एकूण खर्च - |

८. संरक्षण भिंत,नाला,शौचालय,बगीचा तयार करणे,मोकळया जागेचे क्रिडांगणात रुपांतर करणे, स्मशानभूमीत कामे तसेच व्यासपीठ बांधणे,समाजमंदार/व्यायामशाळा/वाचनालय इत्यादी स्वरुपाच्या वांस्तूचे बांधकाम करणेपूर्वी मुंबई महानगरपालिका तसेच संबंधीत जागेची मालकी ज्याच्याकडे अशा सक्षम अधिका-याकडून जागेचे ना-हरकत प्रमाणपत्र संबंधीत कार्यान्वियीन यंत्रणेने प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. कामाचे परिक्षण व देखभालीचे हमीपत्र खात्री करुनच कामास सुरुवाम करावी.

EE(west)

DE-I

Ex. Engr. ... MSIB
J.C. 301
Date 12/5/16
To D.E. Sub-Div. I / TC-I

९. या कार्यक्रमात घेण्यात येणा-या कामाचे परिक्षण व देखभालीचे हमीपत्र संबंधीत सक्षम अधिका-याकडून घेणे आवश्यक आहे.सदरचे हमीपत्र असल्याचे खात्री केल्याशिवाय कामात सुरुवात करु नये.

१०. काम पूर्ण झाल्यावर मंजूर रक्कमेतील बचत अन्य कोणत्याही कामाकडे परस्पर वळविण्यात येऊ नये अथवा बचतीच्या रक्कमेतून नवीन कामांना प्रशासकीय मंजूरी दिली जाणार नाही.

११. या कार्यक्रमाखाली घेण्यात येणा-या सर्व कामासाठी वेळोवेळी ठरवुन दिलेले सर्व नियम, निकष व पध्दती कार्यान्वयीन अभिकरणांवर बंधनकारक राहतील.तसेच योजने अंतर्गत शासनाचे यापुढे वेळोवेळी होणारे बदल कार्यान्वयीन अभिकरणांवर बंधकारक राहतील.

१२ या आदेशान्वये मंजूर कामे दोन हंगामात पूर्ण करण्यात यावीत. याविहित मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास ती कामे आपोआप रद्द समजण्यात येतील यासाठी वेगळे आदेश काढण्यात येणार नाहीत.

१३. घोषित किंवा नोटीफाईड न झालेले गलिच्छ वस्तीमध्ये कोणत्याही प्रकारची कामे या कार्यक्रमातून घेण्यात येऊ नये याची दक्षता संबंधीत कार्यान्वित यंत्रणानी घ्यावी.

१४ या आदेशानूसार मंजूर करण्यात आलेली जोडपत्रातील कामे इतर कोणत्याही योजनेतून घेण्यात (उदा. खासदार स्थानिक विकास कार्यक्रम /नगरसेवक निधी इ.)आलेली नाहीत याची खात्री करुनच कामाला सुरुवात करावी.

१५ अपूर्ण कामांची कामनिहाय माहिती व शिल्लक असलेल्या निधीची सविस्तर माहिती मार्च अखेर (आर्थिक वर्षाच्या शेवटी )जिल्हाधिकरी कार्यालयाकडे कार्यान्वयिन अधिका-यांनी सादर करणे बंधनकारक आहे.

१६. मंजूर केलेली बांधकामे जसे बालवाडी,समाजकल्यानकेंद्र,वाचनालय.अभ्यासिका.व्यायामशाळा.इत्यादी बांधकामे पूर्ण इ.झाल्यानंतर ९०दिवसाच्या आत जनतेच्या सार्वजनिक वापरात येतील याची दक्षता संबधीत कार्यान्वयीन यंत्रणानी घ्यावी. या करीता शासनाने विहित केलेला करारनामा कार्यान्वयीन यंत्रणांनी नोंदणीकृत संस्थेकडून करुन घ्यावा. वास्तू नोंदणीकृत संस्थेस हस्तांतरीत करते वेळी या कार्यालयाचे पत्र क्र -जिनिवि/१०९/का.०३/स्थाविका/हस्तांतरण/९३,दि.१२/०६/१९९८ अन्वये दिलेल्या आदेशाप्रमाणे कागदपत्राचो पूर्तता करुनच कार्यान्वयीन यंत्रणांनी वास्तू संबधीत नोंदणीकृत संस्थेस हस्तांतराबाबतचे आदेश द्यावेत.उपयोगिता प्रमाणपत्र,करारनामा,हस्तांतरण आदेश,आमदाराचे शिफारस पत्र व इतर सर्व कागदपत्राची एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावी,वास्तू हस्तांतरीत केल्यानंतर संबंधीत नोंदणीकृत संस्थेस आवर्ती किंवा अनावर्ती खर्चासाठी योजनेअंतर्गत कसलेही अर्थ सहाय मिळणार नाही.

१७ लेखा तपासणीसाठी आवश्यक असणारी माहिती कार्यान्वयीन आधिका-यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे विहित कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक आहे.

१८ विधानसभा सदस्यांनी सदर काम सुरु करण्याबाबत या कार्यालयास कळविल्यानंतरच काम सुरु करण्याबाबत या कार्याकडून आपल्या कार्यालयास कळविण्यात आल्याशिवाय काम सुरु करु नये.

१९. आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम सन **२०१५-१६** अंतर्गत कार्यान्वयीन अभिकरणांना कामाच्या पूर्ततेसाठी रु. **८००००००/--( अक्षरी रुपये ऐंशी लाख मात्र )**रक्कमेस मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाची अमलबजावनी करणा-या अभिकरणाचे नांव | मंजूर कामांची संख्या | प्रशासकीय मंजूरीची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १. | मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ | ८ | ८०,००,०००/- |
| **एकूण प्रशासकीय मंजूरीची रक्कम रुपये ऐंशी लाख मात्र** | | | ८०,००,०००/- |

सोबत :- जोडपत्र -१

**स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे.**

सही/-
**(शैला ए. )**
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,

~~१) मुख्य~~ अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,गृहनिर्माण भवन,वांद्रे(पूर्व),मुंबई ४०० ०५१

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

१) मा.श्री.विजय (भाई) गिरकर, आमदार महोदय यांना माहितीसाठी सादर.
२) कार्यकारी अभियंता (पूर्व) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ भवन,वांद्रे (पूर्व ),मुंबई ४०० ०५१.
३) मुख्य लेखाधिकारी,मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.
४) लेखाधिकारी/उपलेखापाल, जिल्हा नियोजन समिती, मुंबई उपनगर जिल्हा,
५) निवडनस्ती

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती,
मुंबई उपनगर जिल्हा करीता

प्रशासकीय मंजुरी आदेशाचे जोडपत्र

आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१५-१६ अंतर्गत जिल्हाधिकरी,मुंबई उपनगर जिल्हा यांनी प्रशासकीय मंजूरी प्रदान केलेल्या कामाची यादी.

मा.आ.श्री विजय (भाई) गिरकर, विपस, नोडल जिल्हा मुंबई उपनगर

क्रमांक :- जि.नि.स./१०३०/का.०३/आस्थाविका/२०१५-१६/प्र.क्र.७८/प्रमआक्र. ८४६ दिनांक:-३०.०३.२०१६ (रु.लाखात)

| अ.क्र. | कामाचे स्थानिक विवरण | कामाचा प्रकार/स्वरुप | कामे मंजूरी बाबत संदर्भ | | कार्यान्वयीन यंत्रणा | अंदाजपत्रकीय रक्कम | मंजूर केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आमदाराचे पत्र दिनांक | अंदाजपत्रक दिनांक | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | वसंत कॉम्प्लेक्स जवळ महावीर नगर, कांदिवली (प) येथे | सौंदर्यीकरण करणे | ०४.०३.२०१६ | २९.०३.२०१६ | मुं.झो.सु.मं. | १०.०० | १०.०० |
| २ | रुखी भवन, लिंक रोड, कांदीवली (प) येथे | कपाउँड वॉल बांधणे | ०४.०३.२०१६ | २९.०३.२०१६ | मुं.झो.सु.मं. | १०.०० | १०.०० |
| ३ | सावित्री बाई फुले उद्यान लिंक रोड, कांदिवली (प) येथे | व्यायाम शाळा बांधणे | ०४.०३.२०१६ | २९.०३.२०१६ | मुं.झो.सु.मं. | १०.०० | १०.०० |
| ४ | प्रगती नगर जवळ, महावीर नगर, कांदिवली (प) येथे | शौचालय व जॉगिंग बांधणे | ०४.०३.२०१६ | २९.०३.२०१६ | मुं.झो.सु.मं. | १०.०० | १०.०० |
| ५ | महावीर नगर, कांदीवली (प) येथे | समाज कल्यान केंद्र बांधणे | ०४.०३.२०१६ | २९.०३.२०१६ | मुं.झो.सु.मं. | १०.०० | १०.०० |
| ६ | बाल उद्यान, लिंक रोड, कांदीवली (प) येथे | कपाउँड वॉल बांधणे व खेळाचे साहित्य बसविणे | ०४.०३.२०१६ | २९.०३.२०१६ | मुं.झो.सु.मं. | १०.०० | १०.०० |
| ७ | आंबेवाडी, एम.जी. क्रॉस रोड नं. १ साई नगर, कांदिवली (प) | समाज मंदिर, कपाउँड वॉल व सौंदर्यीकरण करणे | ०४.०३.२०१६ | २९.०३.२०१६ | मुं.झो.सु.मं. | १०.०० | १०.०० |
| ८ | तत्वज्ञान विश्वस्त मंडळ, निलम नगर गव्हाणपाडा, मुलुंड (पुर्व) येथे | समाजमंदिर बांधणे | २४.०२.२०१६ | २२.०३.२०१६ | मुं.झो.सु.मं. | १०.०० | १०.०० |
| | एकूण प्रशासकीय मंजूरीची रक्कम रुपये ऐंशी लाख मात्र | | | | | ८०.०० | ८०.०० |

स्थळ प्रती वर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती
मुंबई उपनगर जिल्हा करीता